शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी घेणाऱ्या अतिक्रमण धारकांनो सावधान हो जाओ!

# विकणारे करू लागले डबल गेम

# अतिक्रमण उठवून पुन्हा जमिनी विकण्याचे षडयंत्र ?

## जिल्हाधिकारी साहेब,वक्फ बोर्ड अन् कंकालेश्वर जमिनीचा वाद न्यायालयात चालू असताना शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी विकणाऱ्याला तात्काळ अटक करा



बीड (सरकार): जगप्रसिध्द कंकालेश्वर याची ५५ एकर जमीन असताना त्या जमिनीवर मालकी हक्क दाखवून व आपणच वारसदार असल्याचे भासवून शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी विकल्या. त्याच बरोबर सर्व्हे नं.१ मध्ये वक्फ बोर्ड आणि जमिनीचा वाद न्यायालयात असताना ही जमीन आपल्या बापदादाची आहे असे समजून शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी खैरातीसारख्या वाटप केल्या व यामधून कोट्यावधी रूपये खिशात घातले. मात्र आता हेच काही लोक अतिक्रमण दाखवून सर्व्हे नं.एक मध्ये अतिक्रमण दाखवून ज्यांच्याकडून पैसे घेतले. त्यांच्याच ताटात माती कालवण्याचे षढयंत्र काही भूमाफियांकडून केले जात आहे. आणि हे अतिक्रमण उठवून पुन्हा त्याच ठिकाणी हेच शंभर रूपयांच्या बॉण्डवर पुन्हा प्लॉटींग पाडून जागा विकण्यात विश्वासघात करून डबल गेम करत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सर्व्हे नं.१ मध्ये राहणाऱ्यांनो तुम्ही ज्या शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी घेतल्या. त्यांच्याकडून पैसे घ्या. कारण न्यायालयात वाद चालू असताना जमिनी घेता व देता येत नसते. त्यामुळे तुमचा विश्वासघात करणारा तुमच्यासमोर आहे. त्यामुळे

## उद्याच्या सुनावणीकडे जिल्ह्याचे लक्ष; तहसील प्रशासन विकणाऱ्यावर करणार अगोदर कारवाई ?

तहसीलदारांनी या गंभीर बाबीची नोंद घेऊन अतिक्रमण धारकांवर नंतर कारवाई करा . मात्र न्यायालयात वाद चालू असताना शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी विकणाऱ्यांवर तात्काळ उद्याच गुन्हे दाखल करण्याचे आदेश द्या अशी चर्चा होत आहे.

बीडमधील कंकालेश्वर मंदिराच्या जमिनीचा काही भाग आणि वक्फ बोर्ड याचा वाद न्यायालयात चालू आहे. न्यायप्रविष्ठ प्रकरण असताना शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी विकणारा जिल्हाधिकारी साहेब मोकाट कसा, तातडीने पोलीस प्रशासनाची बैठक बोलावून अशा जमिनी विकणाऱ्यांना तातडीने अटक करा . आणि सर्व्हे नं.१ मध्ये जे अतिक्रमण झाले आहे त्याचा वाद सोडवा. उद्या तहसील कार्यालयात कंकालेश्वर जमिनीवरील अतिक्रमण आणि शंभर रूपयांच्या बॉण्डवर बेकायदेशीर मालकी हक्क दाखवून जमिनी विकणाऱ्याचे मोठे षडयंत्र झाले. यामध्ये शेकडो लोकांकडून लाखो रूपये गोळा करून कोट्यावधीची माया जमा केली आणि आता हेच लोक हेच अतिक्रमण


सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar




दाखवून प्रशासनाच्या मागे लागले असून पुन्हा ही जमीन रिकामी करून पुन्हा शंभर रूपयांच्या बॉण्डवर प्लॉटींग पाडून प्लॉट विकण्याचा मानस काही लोकांचा समोर आला आहे. गंभीर बाब म्हणजे नव्यानेआलेल्या जिल्हाधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घेऊन देवस्थान कोणत्या धर्माचे असो त्याची जमीन धर्माच्या कामासाठी वापरता येते. मात्र बीडमध्ये जमिनीचा वाद न्यायालयात टाकून शंभर रूपयांच्या बॉण्डवर कोट्यावधी रूपये कमविणारे मोकाट फिरत आहेत. त्यामुळे उद्याच्या सुनावणीत अतिक्रमणारवर कारवाई कधीही होईल. मात्र ज्यांनी शंभर रूपयांच्या बॉण्डवर जमिनी बहाल केल्या. त्यांच्याकडून लाखो रूपये गोळा करून कोट्यावधी रूपये कमविले. त्यांना या सुनावणीत कारवाई करण्यासाठी पुढाकार घ्यावा. आणि तातडीने पोलीस प्रशासनाला जेवढ्या कंकालेश्वर जमिनीवर घरे बांधून बसलेल्यांना जे बॉण्ड दिले आहेत ते बॉण्ड हस्तगत करून पोलीस प्रशासनाला तातडीने देऊन जमिनी विकणाऱ्यांना तातडीने कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सुचना द्याव्यात आणि अतिक्रमण धारकांना दिलासा देऊन त्यांना या भूमाफियांना किती पैसे दिले कसे दिले या संदर्भात पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.


बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २२० वा ■ सोमवार २८ एप्रिल २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक २९ एप्रिल २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 220 ■ Momday 28 April 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


## तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे,जिल्हा खणिकर्म अधिकारी माधव काळे यांच्या संगनमताने

# ७ कोटी रूपयांचा निधी परळीला कसा दिला

## अजय सरवदे यांचा आरोप

बीड (सरकार):बीड जिल्हा खनिज प्रतिष्ठान व्यवस्थापन समितीची बैठक दिनांक १६ ऑक्टोबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती श्रीमती दीपा मुधोळ मुंडे जिल्हाधिकारी बीड व जिल्हा खनीकर्म अधिकारी माधव काळे यांनी संगनमताने १० कोटी ३२ लाख ६२ हजार रुपया पैकी ७ कोटी निधी एकट्या परळी तालुक्यासाठी खर्च केला आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग व कामगार विभाग यांचेकडील दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ च्या प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना सुधारित मार्गदर्शन सूचनेच्या शासन निर्णयाचे वाचन केले त्यामध्ये खान व खनिज (विकसन व विनीयमन) अधिनियम १९५७ च्या कलम ९ ब उपकलम १ च्या तरतुदीनुसार राज्य शासनाद्वारे प्रत्येक जिल्ह्याकरिता खान बाधित क्षेत्राचा विकास करण्याकरिता खनिज विकास प्रतिष्ठान स्थापन करण्याची तरतूद आहे. केंद्र शासनाने प्रस्तुत विषयी निर्णय घेऊन देशातील सर्व राज्यांमधील जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करण्याचे आणि राज्यातील खनिज प्रतिष्ठान मार्फत खान बाधित क्षेत्राचा विकास करण्यासाठी एक वाक्यता राहावी व अशा कार्यक्रमांमध्ये सामाजिक विकास व मूलभूत गरजा तेथिल लोकसंख्या व बाधित क्षेत्राच्या स्थानिक गरजा लक्षात घेऊन प्रधानमंत्री खनिज क्षेत्र योजना जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी मधून राबविण्याबाबत मार्गदर्शन सूचना केंद्रीय खनिकर्म मंत्रालय यांचे आदेश क्रमांक १६ जुलै २०१५ एन तख (पार्ट) दिनांक १६ सप्टेंबर २०१८ अधिसूचित केले.



सद्यस्थितीमध्ये बीड जिल्हा खनिज प्रतिष्ठान मध्ये १०८०.९७ लक्ष इतका निधी शिल्लक असून शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक ३(२) मधील परिच्छेद क नुसार राज्य शासन विहित करेल अशा कमाल मर्यादेच्या अधिन राहून जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या एकूण वार्षिक जमा रकमेच्या जास्तीत जास्त ५% रक्कम प्रशासकीय खर्चा करिता उपयोगात आणता येईल अशी तरतूद आहे त्यानुसार सदर खनिज प्रतिष्ठान निधी १०८०.९७ लक्ष मधून प्रशासकीय खर्चा करता पाच टक्के रक्कम ५४.३५ लक्ष इतका निधी वजा जाता रुपये १०३२.६२ इतका निधी शिल्लक राहत आहे.

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना मधील प्रत्यक्ष खान बाधित क्षेत्रांमध्ये एकूण निधीच्या किमान २/३ निधी खर्च करण्याबाबत करण्यात यावा उर्वरित १/३ निधी अप्रत्यक्ष खान बाधित क्षेत्रात खर्च करण्यात यावा असे नमूद केले आहे. शासन निर्णयातील धोरणानुसार उच्च प्राथमिक बाबींवर किमान ६०% खर्च व अन्य प्राथमिक बाबीवर कमाल ४०% निधी उर्वरित बाबीवर खर्च करणे बाबत तरतूद आहे.

बीड जिल्हा खनिज प्रतिष्ठान मध्ये १०३२.६२ लक्ष इतका निधी शिल्लक आहे पैकी प्रत्यक्ष बाधित क्षेत्रासाठी एकूण निधीच्या २/३ निधी रुपये ६८८.४५ लक्ष निधी पैकी उच्च प्राथमिक बाबीवर ६०% निधी ४१३.०७ लक्ष खर्च करणे अभिप्रेत आहे व अन्य प्राथमिक बाबीसाठी ४०% म्हणजे रुपये २७५.३८ लक्ष खर्च करणे अभिप्रेत आहे. तसेच अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रासाठी एकूण निधीच्या १/३ निधी रुपये ३४४.१७ लक्ष पैकी उच्च प्राथमिक बाबीवर ६०% निधी रुपये २०६.५० लक्ष व अन्य प्राथमिक बाबीसाठी ४०% म्हणजे १३७.६७ लक्ष खर्च करणे अभिप्रेत आहे.


अशा पद्धतीने शासन निर्णयाचे उल्लंघन करत दीपा मुधोळ मुंडे जिल्हाधिकारी बीड, जिल्हा खानिकर्म अधिकारी बीड व अव्वल कारकून गिरीश मोहेकर यांनी ७ कोटीचा निधी परळी तालुक्यासाठी वर्ग केला आहे.

सदर प्रकरणी चौकशी समिती गठित करून प्रशासकीय मान्यतेमध्ये दिलेले कामे पूर्ण केली आहेत का? या अगोदर ती कामे कोण्या योजनेतून केले होते काय? काम करण्याअगोदर व काम केल्यानंतरचे अँगल कॅमेरा मधील फोटो? परळी तालुका खान बाधित आहे का? सदरील कामाची तपासणी जिल्हा खनीकर्म अधिकारी यांनी स्थळ पाहणी करत केली आहे काय? चौकशी करावी. शासन निर्णयाचे उल्लंघन करत प्रशासकीय मान्यता देणाऱ्या जिल्हाधिकारी बीड व अव्वल कारकून, जिल्हा खणीकर्म अधिकारी बीड यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे.

## बडतर्फ रणजीत कासलेच्या अडचणीत आणखीन वाढ

### अंबाजोगाई चौथा गुन्हा दाखल

बीड (सरकार): बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी असलेल्या वाल्मिक कराडसह माजी मंत्री धनंजय मुंडे आणि राज्य सरकारवर थेट आरोप करणाऱ्या बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासलेंच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. रणजीत कासलेविरोधात आणखी एक नवीन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुलाच्या शैक्षणिक शुल्कासाठी पैशांची गरज आहे म्हणून सुदर्शन काळे यांच्याकडून दहा लाख रुपये उसने घेत त्यातील अडीच लाख रुपये परत न केल्याच्या आरोप कासलेंवर करण्यात आले आहेत. या प्रकरणात रणजीत कासले याच्यावर अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पुढे आलेल्या माहितीनुसार, परळी विधानसभा निवडणूक काळात स्ट्राँग रूमपासून दूर राहण्यासाठी मला धनंजय मुंडे यांच्या माणसाने दहा लाख रुपये दिल्याचा दावा कासले यांनी केला होता. परंतु आता त्याचा हा दावा खोटा असल्याचे समोर आले असून त्याने पैसे परत न केल्याने काळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आलाय. रंजीत कासले हा साध्या छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहे.

## नामांकित उद्योजक प्रकाश सुलाखे यांचा आशीया वन इंटरनॅशनल लिडर ग्रेटेस्ट पुरस्काराने गौरव

बीड (सरकार): बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील रहिवाशी असलेले नामांकित उद्योजक म्हणून ओळख असलेले प्रकाश आत्माराम सुलाखे याना केंद्रीय राज्यमंत्री एस.पी.सिंह बाघेल यांच्या हस्ते आशिया वन इंटरनॅशनल लिडर ग्रेटेस्ट पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील अवघ्या छोटेसे खेडे असलेल्या चकलांबा येथील प्रकाश आत्माराम सुलाखे यांनी पुणे येथे नामांकित उद्योजक म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. उद्योजक प्रकाश सुलाखे यांना गोव्याचे मुख्यमंत्री आणि प्रसिध्द अभिनेत्री खा.हेमा मालीनी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्यानंतर उद्योगामध्ये भरारी घेत पुन्हा एकदा उद्योजक प्रकाश सुलाखे यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले नाव कोरले गेले आहे. त्यांच्या या उद्योजकातून झालेली ओळख आणि प्रगती पाहता केंद्रीय राज्यमंत्री एस.पी.सिंह बाघेल यांच्या हस्ते आशिया इंटरनॅशनल लिडर ग्रेटेस्ट पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यामुळे बीड जिल्ह्याचे नाव उद्योजक प्रकाश सुलाखेमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकले गेले असल्याचे दिसून येत आहे.

## पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात हाय अलर्ट, सुरक्षा व्यवस्थेत वाढ

मुंबई (सरकार): गेल्या आठवड्यात मंगळवारी ( २२ एप्रिल) दुपारी जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे फिरायला गेलेल्या पर्यटकांवर काही दहशतवाद्यांनी गोळीबार करत क्रूर हल्ला केला. या हल्ल्यात २६ पर्यटकांनी जाव गमावला तर अनेक जखमी झाले. दहशतावाद्यांच्या या नृशंस कृतीमुळे संपूर्ण देशात संतापाचे वातावरण असून जगभरातूनही या हल्ल्याचा निषेध होतोय. हल्ल्यानंतर भारताने कडक पावल उचलत कठोर भूमिका घेतली. भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना त्यांच्या देशात पाठवण्याची प्रक्रियाही सुरू झाली असून पाकिस्तानातील भारतीयांना १ में पर्यंत मायदेशी परतण्याचे आवाहन करण्यात आलं आहे. दरम्यान काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशात हाय अलर्ट असून ठिकठिकाणी सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील सार्वजनिक ठिकाणांवरील सुरक्षा व्यवस्थाही अधिक कडक करण्यात आली आहे. लोकमान्य टिळक टर्मिनस वर गावी जाणाऱ्या प्रवाशांची तोबा गर्दी झालीये, त्या अनुशंगाने सुरक्षा वाढवण्यात आली असून विषेश व्यवस्था करण्यात आली आहे.

## मुंबईतील ईडीच्या कार्यालयाला आग

मुंबई (सरकार): मुंबईतील ईडी



ऑफिसच्या बिल्डिंगला रविवारी (दि.२८) भीषण आग लागली होती. मुंबईतील बॅलार्ड इस्टेट येथील अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) झोनल ऑफिस क्रमांक-१ मध्ये ही आग लागली होती. यामुळे अनेक कागदपत्रे जळाल्याची माहिती समोर आली होती. यावर आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, इडी कार्यालयाला आग लागल्यानंतर मी ईडीच्या अधिकाऱ्यांशी बोललो आहे. ईडीकडे असलेला प्रत्येक कागद सेफ आहे. त्याचं मिरर इमेजिंग देखील आहे. त्याच स्टोरेज देखील आहे. त्यामुळे या आगीमुळे कोणत्याही केसला केसाचाही धक्का लागलेला नाही.

## शिक्षक भरती प्रक्रियेत खोटी,चुकीची माहिती दिल्यास होणार थेट कारवाई

मुंबई (सरकार): शिक्षक भरती प्रक्रियेत उमेदवाराने पवित्र पोर्टलवर खोटी, चुकीची किंवा अपूर्ण माहिती दिली. कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये कुठल्याही प्रकारची खाडाखोड दिसून आली किंवा प्रमाणपत्र बनावट असल्याचे निदर्शनास आल्यास, उमेदवार कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरून योग्य त्या शिक्षेस पात्र असेल, अशी माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

## संपादकीय

# जल पर्यटनाची नवी दिशा

महाराष्ट्रात विशेषत: मुंबई आणि कोकणातील पाच जिल्हे हे ७२० किलोमीटरच्या विस्तीर्ण अशा समुद्र किनाऱ्यांनी वेढलेले आहेत. जलवाहतुकीच्या माध्यमातून जल पर्यटनाचे एक मोठे विस्तीर्ण क्षेत्र आगामी काळात मुंबई त्याचप्रमाणे मुंबई, महानगर क्षेत्र आणि विशेष करून कोकण प्रांत याकरिता खुले होणार आहे. रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवरचा मोठा ताण हा निश्चितच आगामी काळात जलवाहतुकीच्या माध्यमातून कमी होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर जलवाहतुकीच्या माध्यमातून पर्यटनाचे एक मोठे विस्तीर्ण क्षेत्र रोजगार स्वयंरोजगार आणि व्यापाऱ्याच्या माध्यमातून खुले होणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या अथक आणि सततच्या प्रयत्नांमधून आणि जलवाहतुकीला चालना देण्याच्या प्रयोजनामधून आगामी काळात जलवाहतुकीद्वारे पर्यटनाची दारे मराठी तरुणांना तसेच तरुणींनाही खुली होणार आहेत.

कोकणात जाण्यासाठी कोकण रेल्वे त्याचप्रमाणे रस्ते महामार्ग आणि त्याचबरोबर आता चीपी आणि मनोहर पर्रीकर विमानतळ या दोन विमानतळामुळे हवाई वाहतुकीचा पर्याय देखील कोकणसाठी आणि गोव्यासाठी उपलब्ध झाला आहे. अर्थात येतील हवाई वाहतुकीचा पर्याय आहे हा तसा महागडा आहे. त्यामुळे तो सर्वसामान्य प्रवाशांना परवडेलच याची कोणतीही शाश्वती देता येत नाही. त्यामुळे साहजिकच कोकणात किंवा गोव्याला जायचे म्हटले की रेल्वे किंवा रस्ते वाहतुकीला आपसुकच प्राधान्य मिळते. कोकण रेल्वेमुळे जरी रेल्वे प्रवासाची मोठी सुविधा उपलब्ध झाली असली तरी अद्यापही कोकणात जाण्यासाठी गाड्यांची संख्या ही तशी मर्यादितच आहे. त्यामुळे साहजिकच कोकणात जाऊ इच्छिणाऱ्या आणि कोकणातून पुन्हा मुंबईत येणाऱ्या चाकरमान्यांसाठी कोकण रेल्वेचे आरक्षित तिकीट मिळणे म्हणजे त्याला स्वर्ग दोन बोटे उरणे इतके महत्त्व आहे. गणपती, होळी, कोकणातील जत्रा, यात्रा, उत्सव, शिमगा या काळात तर कोकण रेल्वे हे कायमस्वरूपी हाऊसफूल असते. त्यामुळे बऱ्याचवेळा प्रवाशांच्या पदरी आरक्षित तिकिटाअभावी निराशा पदरी पडते. रस्ते वाहतुकीने जायचे म्हटले, तर एकतर किमान दहा ते बारा तास हे मुंबई ठाण्याहून सिंधुदुर्गात जाण्यासाठी लागतात. त्याशिवाय खासगी गाडी भाडे तसेच येण्या जाण्याचा खर्च हा सर्वसामान्य कोकणी माणसाला परवडण्यापलीकडे असतो. मात्र तरीही कोकणात रस्ते मार्गाने जाणारे चाकरमानी स्वत:च्या गाड्या घेऊन अथवा खासगी गाड्या भाड्याने घेऊन मोठ्या प्रमाणावर कोकणात जात-येत असतातच. अर्थात हे सर्व पर्याय जरी कोकणी माणसाला उपलब्ध असले तरीदेखील जलवाहतुकीला चालना देऊन पर्यटनाची एक नवी संधी तसेच एक नवीन क्षितीज हे आगामी काळात मुंबईसह कोकणातील प्रमुख शहरांमध्ये उपलब्ध होणार आहे. याकरता राज्याचे मत्स्य व्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे हे अत्यंत प्रामाणिकपणाने कष्ट घेऊन मुंबई, कोकणातील जलवाहतुकीला चालना देण्याचे काम करत आहेत. यंदा गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना मंत्री नितेश राणे यांनी मोठी गुड न्यूज दिली असून माझगाव (मुंबई) ते मालवण जलवाहतुकीने अवघ्या पाच तासांत पोहोचता येणार आहे. त्यामुळे गणपतीसाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना यंदा कोकण रेल्वेचे तिकीट जरी मिळाले नाही तरी काळजी करण्याचे कारण नाही. कारण महाराष्ट्र सागरी मंडळाने रो रो बोट सेवेद्वारे जलवाहतुकीची जलद सेवा चाकरमान्यांसाठी गणेश चतुर्थीला उपलब्ध करून दिली आहे.

राज्य सरकार जलवाहतुकीच्या क्षेत्रात मोठे काम करत असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या क्षेत्रात भविष्यात असणाऱ्या जलपर्यटनाच्या संधी लक्षात घेऊन अधिकाधिक काम करण्यास प्राधान्य दिले आहे. त्यामुळेच यंदाच्या गणपती उत्सवात सिंधुदुर्गात जाऊ इच्छिणाऱ्या गणेशभक्तांसाठी माझगावपासून ते थेट मालवणपर्यंत रो-रो बोट सेवेद्वारे जलवाहतूक सुरू करण्यात येणार आहे. या जलद जलवाहतुकीमुळे अवघ्या पाच तासात मुंबईकर चाकरमानी हे मालवणला पोहोचू शकणार आहेत. थेट दुचाकी, चारचाकी गाडी घेऊन माझगाव ते मालवण हा जलप्रवास जलदगतीने करता येणे शक्य आहे. ही रो-रो सेवा प्रवाशांबरोबरच त्यांच्या गाड्यांनाही माझगावपासून थेट मालवणपर्यंत घेऊन जाणार आहे. त्यामुळे प्रवाशांनी त्यांची गाडी घेऊनच थेट माजगाव येथे बसावे आणि मालवण अथवा विजयदुर्ग येथे पोहोचल्यावर तीच गाडी घेऊन आपल्या गावातील घरी पोहोचावे अशीही डोअर टू डोअर सेवा असणार आहे. याकरता मालवण आणि विजयदुर्ग असे दोन पर्याय देण्यात आले असून ज्यांना मालवण येथे पोहोचायचे असेल त्यांनी मालवणला, तर ज्यांना विजयदुर्ग येथून कोकणातील आपल्या गावी जायचे असेल त्यांच्याकरता विजयदुर्ग येथे दुसरा पर्याय देण्यात आला आहे. यामुळे दरवर्षी गणपतीच्या निमित्ताने कोकणात जाऊ इच्छिणाऱ्या चाकरमान्यांना रस्ते वाहतुकीच्या तसेच रेल्वेचे तिकीट न मिळाल्यामुळे होणाऱ्या त्रासापासून मोठा दिलासा मिळणार आहे. या जलवाहतुकीमुळे कोकण रेल्वे वरील त्याचप्रमाणे रस्ते वाहतुकीवरील प्रवाशांची गर्दी तसेच वाहतुकीवरील ताण हा मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकणार आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या माध्यमातून पर्यटन, व्यापार, उद्योग, रोजगार, स्वयंरोजगार आणि नोकरीच्या संधी देखील तरुण-तरुणींसाठी उपलब्ध होणार आहेत. याबरोबरच मुंबई महानगर प्रदेशातील वॉटर ट्रान्सपोर्टला म्हणजेच जलवाहतुकीला शासकीय पातळीवर गती देण्याचे काम प्रगतिपथावर असून याबाबतचे डीपीआर (सविस्तर प्रकल्प अहवाल) तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. यावर्षी नाही मात्र आगामी वर्षात साधारणपणे फेब्रुवारी, मार्चच्या सुमारास कोचीनच्या धर्तीवर मुंबई महानगर प्रदेशातील वॉटर मेट्रोला मान्यता देण्यात येईल. याकरता मुंबई, ठाणे, कल्याण, भिवंडी, वसई, विरार, मीरा-भाईंदर अशा आठ ठिकाणी वॉटर मेट्रो करता टर्मिनल उभारण्यात येणार आहे. वॉटर मेट्रोचा मार्ग निश्चित करून याबाबतचा आराखडा ही अंतिम करण्यात येणार आहे. या वॉटर मेट्रोमुळे मुंबई महानगर प्रदेशातील रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवरचा पडणारा मोठा ताण हा विभागला जाणार असून जलवाहतुकीचा मोठा पर्याय आगामी काळात मुंबई, ठाणे आणि पालघरवासीयांना खुला होऊ शकणार आहे.

मुंबईमध्ये रस्ते वाहतूक आणि उपनगरीय रेल्वे सेवा त्याचबरोबर बेस्ट आणि एमएमआरडीए परिसरातील महापालिकांच्या स्थानिक परिवहन सेवा यांच्यावर प्रवासी वाहतुकीचा प्रचंड ताण असतो. एका सर्वेक्षणानुसार मुंबई-ठाणे जिल्हा पालघर आणि रायगड जिल्हा असे जर एमएमआरडीएचे क्षेत्र लक्षात घेतले तर साधारण दररोज दोन ते अडीच हजार नव्या चार चाकी गाड्या या रस्त्यावर येत असतात. वाहनांच्या प्रचंड आणि बेसुमार गर्दीमुळे रस्त्यावरील वाहतूक कासव गतीने होत असते. त्यात दररोज काही हजार गाड्यांची भर पडत असल्यामुळे रस्त्यावर कुठेही जरासे खड्ड जरी झाले तरी रस्ते वाहतूक कोलमडून पडते आणि वाहनचालक व प्रवासी हे तासंतास ट्रॅफिक जाम मध्ये अडकून पडतात. त्यामुळेच रस्ते वाहतुकीला त्याचबरोबर सकाळ-संध्याकाळ आणि अगदी दुपारी देखील तुफान गर्दीत ओसंडून वाहणाऱ्या मुंबईच्या उपनगरीय लोकल वाहतुकीला जर जलवाहतुकीची जोड मिळाली तर निश्चितच मुंबई ठाणे जिल्हा पालघर जिल्हा तसेच रायगड जिल्ह्यापर्यंत पसरलेल्या विस्तीर्ण अशा मुंबई महानगर क्षेत्राला मोठा दिलासा मिळू शकणार आहे.

# पुलवामा, पहलगाम ते पाकिस्तान



२२ एप्रिल २०२५ रोजी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष वेन्स हे भारतात होते, पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियात होते. भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीरमध्ये देशाच्या विविध भागांतून आलेले हजारो पर्यटक निसर्ग सौंदर्याचा मनसोक्त आनंद लुटत होते. काश्मीरच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला पर्यटन व्यवसाय बहरत असताना दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये २६ हिंदू पर्यटकांना समोरून गोळ्या घातल्या. काश्मीरचे स्वित्झर्लंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरन खोऱ्यात निरपराध व निष्पाप पर्यटकांच्या हत्याकांडाने रक्ताचा सडा पडला. त्या दिवशी बैसरनमध्ये येऊन कोणी घोडेस्वारीचा आनंद घेत होते, कोणी खाण्यापिण्यात मस्त दंग होते, मुले खेळत होते, मस्ती करत होते, कोणी फोटो काढत होते, तर कोणी व्हीडिओ शूटिंगमध्ये निसर्गाचे सौंदर्य टिपत होते. अचानक गोळीबाराचे आवाज आले, पोलिसांच्या गणवेषात काही धावताना दिसले, पोलिसांबरोबर कुणाची तरी चकमक चालू आहे असे पर्यटकांना क्षणभर वाटले पण ते तरुण दहशतवादी हातात बंदूक घेऊन प्रत्येकाला नाव विचारायला लागले, तू हिंदू का मुस्लीम असा प्रश्न थेट विचारू लागले, कलाम पढायला सांगू लागले आणि एकापाठोपाठ एक अशा हिंदू पर्यटकांना डोक्यावर, छातीवर गोळ्या घालून ठार मारू लागले. पत्नी आणि मुलांसमोर त्यांनी पुरुष पर्यटकांवर गोळ्यांचा वर्षाव केला. एवढा मोठा रक्तपात काश्मीर खोऱ्यात कित्येक वर्षांत घडला नव्हता. त्या दिवशी पहलगाम परिसरात अडीच हजार पर्यटक होते. बैसरनच्या पठारावर मराठी, हिंदी, कन्नड, तमिळ, गुजराती असे विविध भाषिक पर्यटक जमले होते. दहशतवाद्यांनी कोणालाही त्यांची जात, त्यांचा प्रांत किंवा त्यांची भाषा कोणती असा प्रश्न विचारला नाही, तर ते कोणत्या धर्माचे आहेत एवढाच प्रश्न विचारत होते काहींनी पर्यटकांकडे आधारकार्ड व ड्रायव्हिंग लायसन्सची मागणी केली, ज्या पर्यटकांविषयी संशय आला त्यांच्या अंगावरची पँट काढून खतना तपासला. खतना न केलेल्यांना त्यांनी जवळून गोळी घातली, जे गप्प बसले, तेही रक्ताच्या थारोळ्यात पडले.

पहलगाम हे पर्यटकांचे मोठे आकर्षण स्थळ आहे. सर्व देशांतून काश्मीरमध्ये येणारे पर्यटक श्रीनगर, गुलमर्ग आणि पहलगाम येथे हमखास येतात. पहलगाम हे भारत-पाकिस्तान सरहद्दपासून बरेच दूर आहे. सरहद्दीपासून पहलगामला पोहोचायला आठ तास तरी लागतातच. अशा दूर अंतरावर पाकिस्तानमधून आलेले प्रशिक्षित व सशस्त्र दहशतवादी पोहोचले तरी कसे? हे गूढ अजून उकललेले नाही. किश्तवाडमधून त्रालच्या दाट जंगलातून हे पायपीट करून आले असण्याची शक्यता आहे. पण ते पहलगामला पोहोचून तेथे २६ हिंदू पर्यटकांचे रक्ताचे सडे उडवेपर्यंत जम्मू-काश्मीर पोलीस, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव सुरक्षा दल, निमलष्करी दले आणि लष्करी सैन्यदलालासुद्धा त्याचा थांगपत्ता लागला नाही, याचे मोठे आश्चर्य वाटते. जम्मू-काश्मीर हा देशातील सर्वात मोठा संवेदनशील व हाय सिक्युरिटी झोन आहे. पाकिस्तानच्या सरहद्दीला लागून हे राज्य आहे. चोवीस तास डोळ्यांत तेल घालून तेथे घडणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवले जाते. मग यावेळी आपण कमी कुठे पडलो?

पाकिस्तानच्या सीमेवरून दहशतवादी घुसले तेव्हा आपले सुरक्षा दल कुठे होते? दहशतवादी हे पोलिसांच्या किंवा लष्करी सैनिकांच्या गणवेषात पहलगामला आले होते, त्यांना सुरक्षा दलाचे गणवेष कुणी पुरवले? ते त्यांनी कुठे अंगावर घातले? अंगावरचे कपडे कुठे बदलले व कुठे लपवून ठेवले? पहलगाममध्ये अडीच हजार पर्यटक असताना ज्या बैसरनमध्ये हत्याकांड घडले त्याच्या जवळपास कुठेही सुरक्षा व्यवस्था नव्हती. कुठेही पोलीस चौकी नव्हती. कुठेही गस्त नव्हती. दहशतवाद्यांना रोखायला कोणतीच सुरक्षा यंत्रणा नसावी हे असे कसे घडू शकते? विशेष म्हणजे गोळीबार झाल्यावर व २६ पर्यटकांची हत्या झाल्यावर दहशतवादी तिथेच काही काळ होते पण सुरक्षा व्यवस्थेला काही कळू शकले नाही, हे चिंताजनक आहे. दहशतवादी निश्चितच हत्याकांड घडविण्यापूर्वी अगोदर आलेले असणार. ते काही बंदुका हातात घेऊन जंगलात फिरत बसणार नाहीत, मग ते कुठे राहिले, कुठे जेवले, त्यांना मदत करणारे स्थानिक कोण आहेत? घटनेनंतर पाच दिवस उलटले तरी त्याचा तपशील बाहेर आला नाही.

मोदी सरकारच्या ०२ कारकिर्दीत पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याने सर्व देशाचा थरकाप उडला होता. दहशतवादी देशात कसे घुसले? तिथपर्यंत कसे पोहोचले, सुरक्षा दलाच्या जवानांना घेऊन जाणाऱ्या बसपर्यंत ते कसे पोहोचू शकले? साडेचारशे किलो आरडीएक्स हाय सिक्युरिटी झोनमध्ये कसे येऊ शकले? सुरक्षा दलाचे जवान विमानाने न जाता बसेसमधून प्रवास करीत आहेत ही माहिती दहशतवाद्यांपर्यंत कशी पोहोचली? पुलवामा हल्ला करणारे दहशतवादी कोण आहेत, कुठे आहेत? पुलवामाचा बदला म्हणून भारतीय सैन्य दलाने पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये घुसून बालाकोटला एअर स्ट्राईक करून दहशतवाद्यांचे असंख्य अड्डे उद्ध्वस्त केले असे सांगितले गेले, मग त्यानंतरही काश्मीरवर दहशतवादी हल्ले कसे चालू राहिले? तेव्हा ४४ सुरक्षा दलाच्या सैनिकांची हत्या झाल्यावर इंटेलिजन्सचे अपयश म्हणून आरोप झाले, आता पहलगाम पर्यटकांच्या हत्याकांडानंतरही इंटेलिजन्सवर खापर फोडले जात आहे. पुलवामा हत्याकांडानंतर जम्मू-काश्मीरचे तत्कालीन उपराज्यपाल सतपाल मलिक यांनी त्या घटनेबाबत सरकारला दोष दिला होता. सरकारने दुर्लक्ष केले, असे म्हटले होते. पण त्या घटनेला कोण जबाबदार आहे हे कधी समजलेच नाही.

पहलगाम हत्याकांडाची जबाबदारी पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तोयबाशी संलग्न असलेल्या द रेजिस्टेंस फ्रंट (टीआरएफ)ने घेतली होती ती नंतर घुमजाव करून झटकली.दहशतवादी दक्षिण काश्मीरमधील कोकेरनाग येथून किश्तवाड मार्गे बैसरनला पोहोचले. बर्फाच्छादीत पर्वतांनी वेढलेल्या बैसरनच्या पठारावर दहशतवादी दुपारी ३ वाजता पोहोचले तेव्हा देशाच्या विविध भागांतून आलेले पर्यटक त्यांच्या मित्र मंडळी व परिवारासह मौज-मजा मस्तीत आनंद लुटत होते. आपल्याला कोणी प्रतिकार करणारे नाही, पर्यटक नि:शस्त्र आहेत. जवळपास कुठेही सुरक्षा व्यवस्था नाही. हे दहशतवाद्यांना पूर्ण ठाऊक असावे. बैसरनपासून ५ किमी अंतरावर सीआरपीएफचा कॅम्प आहे, पण त्याचीसुद्धा दहशतवाद्यांना पर्वा नव्हती.

मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २०० निरपराध मुंबईकरांचा बळी गेला. मुंबई पोलीस दलातील धाडसी व आक्रमक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनाही दहशतवाद्यांशी लढताना मरण आले, पण मुंबई पोलिसांनी आलेले सर्व दहशतवादी वेचून वेचून ठार मारले. एवढेच नव्हे तर अजमल कसाबला पोलिसांनी जिवंत पकडला व पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा सर्व जगाला दाखवला. त्याच कसाबला नंतर फाशी झाली. संसदेवर दहशतवादी हल्ला झाला तेव्हाही सर्व दहशतवादी संसदेच्या प्रांगणातच ठार मारले गेले. मुंबईवरील आणि संसदेवरील हल्ल्यात दहशतवादी हे लष्करी गणवेषात होते. तसेच पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यातही दहशतवादी लष्करी गणवेषात होते. दुर्दैवाने पुलवामा येथील हल्ल्यात पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा म्हणून कोणाला पकडून जगाला दाखवता आलेला नाही. पहलगाम येथे हत्याकांड घडविणारे दहशतवादी कसे-कुठे पसार झाले ते अजून समजलेले नाही.

गेली सहा दशके जम्मू-काश्मीरला घटनेतील ३७० कलमानुसार विशेष दर्जा होता. जम्मू-काश्मीरचा झेंडा सुद्धा वेगळा होता. केंद्राने केलेले कायदे काश्मीरच्या विधानसभेने मंजूर केल्यावर तिथे लागू होत असत. काश्मीरमध्ये हिंदुस्थानातील कोणात्याही व्यक्तीला मालमत्ता खरेदी करता येत नसे. मोदी सरकारने ३७० वे कलमच काढून घेतले, त्यावर संसदेने शिक्कामोर्तब केले. जम्मू-काश्मीरचे विभाजन करून लेह लडाख वेगळा केला. काश्मीर हा केंद्रशासित प्रदेश केला. काश्मीरला विधानसभा दिली, पण पूर्ण दर्जा अजून मिळालेला नाही. मुख्यमंत्र्यापेक्षा जास्त अधिकार तेथील उपराज्यपालाला आहेत. पण अशा मुद्द्यावरून काश्मीरमध्ये असंतोष व अशांतता कशी निर्माण होईल यासाठी पाकिस्तान सतत प्रयत्न करीत असतो. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असीम मुनीर हे भारताच्या विरोधात नेहमीच गरळ ओकण्याचे काम करीत असतात. दि. १६ एप्रिल २०२५ रोजी इस्लामाबाद येथे एका परिषदेत ते म्हणाले, काश्मीर ही पाकिस्तानच्या गळ्यातील नस आहे. ती कधीही विसरली जाणार नाही. काश्मिरी बांधवांना त्यांच्या शौर्यपूर्ण संघर्षात एकटे सोडणार नाहीपाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा असिफ म्हणाले, भारताने पाकिस्तान शहरात घुसून कारवाई केल्यास त्याची किंमत भारताला मोजावी लागेल. जर पाकिस्तानी नागरीकांना काही इजा झाली, तर भारतीय नागरीक सुरक्षित राहणार नाहीत (पहलगाममध्ये निरपराध २६ हिंदू पर्यटकांच्या भीषण हत्याकांडानंतर भारताने गप्प बसून सहन करावे असे पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांना वाटते काय?) पहलगाम हत्याकांडानंतर त्याच्याशी आमचा काही संबंध नाही, हल्ला करणारे स्वातंत्र्य सैनिक असू शकतात अशी प्रतिक्रिया पाकिस्तानने व्यक्त केली होती म्हणूनच अजमल कसाबसारखा दहशतवादी चेहरा जिवंत पुरावा म्हणून भारताला, जगाला पुन्हा एकदा दाखवावा लागेल पहलगामची घटना म्हणजे पाकिस्तानकडून भारतावर हमाससारखा झालेला हल्ला आहे. आता भारत सरकार इस्त्रायलप्रमाणे सडेतोड उत्तर देणार याची सारे जग वाट पाहत आहे. पहलगाममध्ये हत्याकांड घडवून पाकिस्तानने भारताच्या विरोधात फार मोठा जुगार खेळला आहे.

# मासिक पाळीपूर्वी जास्त भूक लागते का, जाणून घ्या कारण...

मासिक पाळीपूर्वी तुम्हालाही भूक वाढल्याचे जाणवले आहे का? जेवणानंतर तुम्हालाही जास्त खाण्याची इच्छा होते का? तर आज या लेखात आपण याचे कारण स्पष्ट करू. पण सर्वप्रथम, तुम्हाला हे माहित असणे आवश्यक आहे की मासिक पाळीपूर्वी भूक वाढणे पूर्णपणे सामान्य आहे, म्हणून काळजी करण्यासारखे काही नाही.

**मासिक पाळीपूर्वी भूक का वाढते?**

हे समजून घेण्यासाठी, प्रथम तुम्हाला तुमचे मासिक पाळीचे चक्र समजून घ्यावे लागेल. एका महिलेचे मासिक पाळीचे चक्र साधारणपणे २८ ते ३० दिवसांचे असते. १४ किंवा १५ दिवस ती ओव्हुलेशन प्रक्रियेतून जाते आणि या काळात अंडाशयातून एक अंडी बाहेर पडते. या काळात, महिलेच्या शरीरात बरेच हार्मोनल बदल होतात. ओव्हुलेशन आणि पुढील मासिक पाळीपूर्वी, महिलेच्या शरीरात दररोज सुमारे २०० ते ३०० कॅलरीज बर्न होतात. या काळात, महिलेच्या शरीरात प्रोजेस्टेरॉन हार्मोन वाढतो, ज्यामुळे शरीराचे तापमान देखील वाढू लागते. हे सर्व व्यवस्थापित करण्यासाठी, महिलेचे शरीर अधिक कॅलरीज बर्न करते.

मासिक पाळीपूर्वी भूक वाढण्याची अनेक कारणे असू शकतात, त्यापैकी काही प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत:

**१. हार्मोनल बदल :** मासिक पाळीच्या काळात आपल्या शरीरात अनेक प्रकारचे हार्मोनल बदल होतात. इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉन नावाच्या हार्मोन्सची पातळी वाढत आणि कमी होत राहते. प्रोजेस्टेरॉन हार्मोन वाढल्यामुळे भूक आणि तल्लफ वाढते.

**२. पीएमएस (मासिक पाळीपूर्वीचा सिंड्रोम) :** काही महिलांना मासिक पाळीपूर्वी पीएमएसची लक्षणे जाणवतात. या लक्षणांमध्ये मूड स्विंग्स, टेन्शन, चिंता आणि वाढलेली भूक यांचा समावेश आहे.

**३. शरीराच्या गरजा :** मासिक पाळीच्या काळात शरीराला जास्त ऊर्जेची आवश्यकता असते. म्हणून, शरीराला जास्त अन्नाची आवश्यकता असते.




**४. ताण :** भूक वाढण्याचे कारण तणाव देखील असू शकते. काही महिलांना मासिक पाळीच्या वेळी ताण येतो, ज्यामुळे त्यांची भूक वाढते.

भूक नियंत्रित करण्यासाठी तुम्ही काही गोष्टी करू शकता:
* निरोगी खाणे: फळे, भाज्या आणि संपूर्ण धान्य यासारखे निरोगी पदार्थ खा.

* **नियमित व्यायाम:** नियमित व्यायामामुळे ताण कमी होतो आणि भूक नियंत्रित होते. * पुरेशी झोप: पुरेशी झोप घेतल्याने हार्मोन्स संतुलित राहतात आणि भूक कमी होते. * ताण व्यवस्थापन: ताण कमी करण्यासाठी योग, ध्यान किंवा इतर तंत्रांचा वापर करा.

* **डॉक्टरांचा सल्ला घ्या:** जर तुम्हाला मासिक पाळीपूर्वी खूप भूक लागली असेल आणि तुम्ही ती नियंत्रित करू शकत नसाल तर डॉक्टरांचा सल्ला घ्या. मासिक पाळीपूर्वी भूक वाढणे सामान्य आहे. हे हार्मोनल बदल आणि पीएमएसमुळे होते. निरोगी आहार, नियमित व्यायाम आणि ताण व्यवस्थापनाद्वारे तुम्ही ते नियंत्रित करू शकता.

# साखर नियंत्रणासाठी ही प्रभावी आसने अवश्य करून पहा

भारतात मधुमेहाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे आणि याचे मुख्य कारण जीवनशैली आणि खाण्याच्या सवयींमध्ये बदल आहे. मधुमेहापासून मुक्तता मिळविण्यासाठी योग हा एक प्रभावी आणि नैसर्गिक मार्ग असू शकतो. मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरणारी काही योगासनं येथे आहेत.

**१. सूर्यनमस्कार :** सूर्यनमस्काराचा सराव शरीराला एकंदर निरोगी ठेवण्यासाठी ओळखला जातो. हे योगासन केवळ चयापचय वाढवत नाही तर रक्ताभिसरण देखील सुधारते. ते कसे करावे: हे सकाळी रिकाम्या पोटी ५-१० वेळा करा. यात १२ स्टेप्स असतात, ज्या शरीराच्या सर्व प्रमुख स्नायूंना सक्रिय करतात.

फायदा: हे शरीराचे वजन नियंत्रित करण्यास मदत करते आणि साखरेची पातळी संतुलित ठेवते.

**२. अर्ध मत्स्येंद्रासन :** या आसनामुळे पोट आणि आतड्यांवर दबाव येतो, ज्यामुळे स्वादुपिंड सक्रिय होण्यास मदत होते. मधुमेहाच्या रुग्णांसाठी हे खूप फायदेशीर आहे.

ते कसे करावे: तुमचे पाय समोर पसरून बसा, नंतर एक पाय वाकवा आणि दुसऱ्या गुडघ्यावर ठेवा आणि तुमचे शरीर विरुद्ध दिशेने फिरवा. हे दोन्ही बाजूंनी आळीपाळीने करा.

फायदा: रक्तातील साखर नियंत्रित करते आणि पचन सुधारते.

**३. वज्रासन :** जेवणानंतर वज्रासन केल्याने पचनसंस्था मजबूत होते आणि शरीरातील इन्सुलिनची पातळी स्थिर राहण्यास मदत होते. ते कसे करावे: गुडघ्यांवर बसा आणि शरीराचे वजन टाचांवर ठेवा. ५-१० मिनिटे पाठीचा कणा



सरळ ठेवून बसा. फायदा: हे पचन सुधारते, जे मधुमेहाच्या व्यवस्थापनासाठी खूप महत्वाचे आहे.

**४. मांडुकासन :** मंडुकासन मधुमेहाच्या रुग्णांसाठी विशेषतः फायदेशीर मानले जाते. यामुळे स्वादुपिंडावर दबाव येतो, ज्यामुळे इन्सुलिनचे उत्पादन वाढू शकते. कसे करावे: वज्रासनात बसा आणि तुमच्या घट्ट मुठी पोटावर ठेवा. आता शरीर पुढे वाकवा आणि काही सेकंद या स्थितीत रहा. फायदा: स्वादुपिंडाचे कार्य सुधारून रक्तातील साखरेचे प्रमाण संतुलित करते.

**५. प्राणायाम :** मधुमेहाच्या रुग्णांसाठी प्राणायाम खूप फायदेशीर आहे. विशेषतः अनुलोम-विलोम आणि कपालभाती प्राणायाम साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करतात.कसे करावे: शांत ठिकाणी बसून अनुलोम-विलोम किंवा कपालभातीचा सराव करा. हे ५-१० मिनिटे करा. फायदा: हे रक्ताभिसरण सुधारते, ताण कमी करते आणि शरीरात ऑक्सिजनची पातळी वाढवते.

# औषधांशिवाय तुमच्या आरोग्याची काळजी घ्या; १० सोपे घरगुती उपाय

आपले आरोग्य हे आपल्या जीवनातील सर्वात महत्वाचा भाग आहे. किरकोळ आजार आणि थकवा आपल्याला अनेकदा त्रास देऊ शकतो आणि यासाठी औषधांवर अवलंबून राहणे नेहमीच योग्य नसते. आपल्या घरात असे अनेक घरगुती उपाय आहेत, जे आपल्याला निरोगी ठेवतातच, शिवाय आपल्या शरीराला नैसर्गिकरित्या बरे करण्यास देखील मदत करतात. चला तर मग जाणून घेऊया अशा १० सोप्या घरगुती उपायांबद्दल जे आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकतात.



**१. घसा खवखवण्यासाठी आले आणि मधाचे सेवन करणे :** आले आणि मधामध्ये बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ गुणधर्म असतात, जे घसा खवखवणे आणि खोकला कमी करण्यास मदत करतात. एक चमचा आल्याचा रस आणि एक चमचा मध मिसळून दिवसातून दोनदा घेतल्याने घशात आराम मिळतो.

**२. हळदीचे दूध** – रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी निरोगी घरगुती उपचार निरोगी घरगुती उपचारहळदीमध्ये अँटीऑक्सिडंट आणि दाहक-विरोधी गुणधर्म असतात. रात्री झोपण्यापूर्वी हळदीचे दूध सेवन केल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि शरीराची नैसर्गिक संरक्षण प्रणाली मजबूत होते.

**३. ओव्याचे पाणी** – पचन सुधारण्यासाठी : ओव्यामध्ये थायमॉल असते, जे पचन सुधारते. पाण्यात उकळून ओव्याचे बियाणे प्यायल्याने गॅस आणि अपचनापासून आराम मिळतो. दररोज सकाळी रिकाम्या पोटी हे सेवन केल्याने पचनक्रिया सुधारते.

४. आवळ्याचा रस – त्वचा आणि केसांसाठी आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे केस आणि त्वचा निरोगी ठेवते. दररोज एक ग्लास आवळ्याचा रस प्यायल्याने केस गळणे कमी होते आणि त्वचा चमकदार राहते.

**५. तुळशीची पाने – सर्दी आणि खोकल्यासाठी :** निरोगी घरगुती उपचार निरोगी घरगुती उपचारतुळशीमध्ये बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. सर्दी आणि खोकल्यामध्ये तुळशीची पाने चावणे किंवा तुळशीचा चहा पिणे फायदेशीर आहे.

**६. लिंबू आणि मधाचे पाणी** – वजन कमी करण्यासाठी दररोज सकाळी रिकाम्या पोटी लिंबू आणि मध मिसळून एक ग्लास कोमट पाणी प्यायल्याने चयापचय गतिमान होते आणि वजन कमी होण्यास मदत होते. हे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास देखील मदत करते.

**७. लसूण** – हृदयाच्या आरोग्यासाठी लसणामध्ये ॲलिसिन नावाचा घटक असतो, जो कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतो. दररोज रिकाम्या पोटी कच्च्या लसूण पाकळ्या खाल्ल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते.

**८. त्रिफळा पावडर** – पोट साफ करण्यासाठीत्रिफळा पचन सुधारण्यासाठी आणि पोट साफ करण्यासाठी खूप प्रभावी आहे. रात्री झोपण्यापूर्वी एक चमचा त्रिफळा पावडर एक ग्लास कोमट पाण्यासोबत घेतल्याने पोटाच्या समस्या दूर होतात.

**९. कच्चा पपई** – त्वचेच्या समस्यांसाठी

पपईमध्ये एंजाइम असतात, जे त्वचेला ओलावा आणि पोषण देतात. पपईची पेस्ट बनवून चेहऱ्यावर लावल्याने मुरुमे कमी होतात आणि त्वचा सुधारते.

**१०. नारळ तेल** – दात आणि हिरड्यांसाठी नारळाच्या तेलात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ गुणधर्म असतो, जो दात आणि हिरड्या मजबूत करतो. ५-१० मिनिटे नारळाच्या तेलाने धुतल्याने दात स्वच्छ राहतात आणि हिरड्या निरोगी राहतात.

बीड **सरकार**

सोमवार दिनांक २८ एप्रिल २०२५



# विशेष वृत्त

## भाजपा तालुकाध्यक्षपदी रोडे यांची निवड

**वडवणी :** भाजपचे माजी पंचायत समिती सदस्य सुखदेव रेडे यांची नुकतीच भाजपचे वडवणी - तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. वडवणी तालुक्यातील देवळा येथील सर्व सामान्य शेतकरी कुटुंबातील सुखदेव रेडे यांनी आपली राजकीय सुरूवात भारतीय जनता पार्टी पक्षापासून केली. गेल्या अनेक वर्षांपासून कुठल्याही प्रकारची अशा न बाळगता पक्षाशी आणि मुंडे घराण्याशी एकनिष्ठ राहून भाजपाचे काम करत राहिले. मंत्री पंकजा मुंडे यांनी त्यांना देवळा पंचायत समितीचे - तिकीट देऊन निवडून आणले. त्यांच्या कार्याची दखल घेवून आ. रविंद्र चव्हाण (कार्यकारी अध्यक्ष भाजपा प्रदेश महाराष्ट्र राज्य) जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी दाखल घेऊन सुखदेव रेडे यांची भाजपचे वडवणी तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

## वीज पडून म्हैस दगावली

**चौसाळाः** येथून जवळच असलेल्या जेबापिंप्री येथे शनिवारी (दि. २६) रोजी दुपारी तीन वाजेच्या दरम्यान ढगाळ वातावरण झाले होते. अचानक वादळ वारा सुटला आणि विजांचा कडकडाट सुरू झाला. जेबापिंप्री येथील शेतकरी शहाजी नवनाथ कागदे यांच्या गट नंबर १७३ मध्ये गोठ्याजवळ बांधलेली मुरा जातीची म्हैस ही वीज पडून ठार झाली. सदरील घटना समजल्यानंतर शेतकरी - यांनी संबंधित तलाठी मंडळ अधिकारी व पशुवैद्यकीय अधिकारी यांना दूरध्वनीद्वारे सदरेल घटनेची माहिती दिली. या घटनेमुळे शेतकरी शहाजी नवनाथ कागदे यांच्यावर संकट ओढावले आहे. महसूल विभागाने सदरील घटनेचा तात्काळ पंचनामा करावा व पशुवैद्यकीय अधिकारी यांनी शवविच्छेदन करून अहवाल द्यावा जेणेकरून शेतकऱ्याला आर्थिक मदत मिळण्यास मदत होईल अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांतून होत आहे.

## स्वामी समर्थ केंद्रात नामजप सप्ताह





**माजलगाव :** श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी अखंड नाम जप यज्ञ सप्ताह येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सात दिवसांत श्री गुरुचरित्र पारायण, अखंड प्रहरे, मंडल मांडणी, यज्ञ भुमी मध्ये नित्य स्वाहाकार, गणेश याग, मनोबोध याग, चंडी याग, स्वामी समर्थ याग, रुद्र मल्हारी याग, गीताई याग तसेच दहि भात लेपन, श्री नवनाथ भक्तिसार पारायण, सुलभ भागवत पारायण, श्रीपाद श्रीवल्लभ चरित्र पारायण, हवन युक्त श्री गुरुचरित्र पारायण, दररोज श्री स्वामी चरित्र सारामृत पारायण, श्री दुर्गा सप्तशती पाठ, श्री मल्हारी सप्तशती पाठ, त्याच बरोबर बालसंस्कार वर्ग घेण्यात आले. सायंकाळी नैवेद्य आरतीनंतर गीतेचा पंधराव्या अध्यायाचे वाचन, श्री विष्णू सहस्त्रनाम, मनाचे श्लोक, पसायदान, संत तुकाराम महाराजांचा अभंग इत्यादी सर्व सेवा घेण्यात आल्या. श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी दिवशी सकाळी श्री सत्यदत्त पूजन, बलीपुर्णाहुती इत्यादी अध्यात्मिक उपक्रम परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने व आदेशानुसार घेण्यात आला. सकाळी ठिक साडे दहा वाजता नैवेद्य महाआरती करण्यात आली. यावेळी माजलगाव शहरासह तालुक्यातील विविध भागातून भाविक महिला पुरुष, सेवेकरी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. यानंतर सर्वांना सप्ताहाचा मांदियाळी महाप्रसाद वाटप करण्यात आला. हा सप्ताह यशस्वी करण्यासाठी समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी परिवार यांनी प्रयत्न केले.

## परळी येथे शिवपुराण कथेचे आयोजन

**परळी :** सोमवार दि.२८ एप्रिल ते ४ मे या कालावधीत शिवमहापुराण कथा व किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून थर्मल कॉलनी मध्ये होणाऱ्या शिव महापुराण कथेस परळी व पंचक्रोशीतील भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. गुरुवर्य माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या कृपाशीर्वादाने गेल्या ३५ वर्षापासून थर्मल कॉलनी हनुमान मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताह तथा ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित केला जातो. यावेळी व्यासपिठ प्रमुख माणिक बिडगर हे राहणार आहेत. किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शिव महापुराण कथेची वेळ दुपारी एक ते चार असून कथा प्रवक्त्या जनाई महाराज कोकाटे संगमकर यांच्या अमृतमय वाणीतून कथा श्रवण करण्याकरिता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आलेले आहे.

## बर्दापूरच्या विद्यार्थ्यांचे स्कॉलरशीप परिक्षेत यश

**अंबाजोगाई :** तालुक्यातील बर्दापूर येथील माऊली सेमी अॅन्ड इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी कॉलरशिप परीक्षेत शिष्यवृत्ती पात्र होऊन आई वडिलांचे व शाळेचे नाव उज्वल केल्याची भावना मुख्याध्यापक तानाजी मोरे, मुख्याध्यापिका सुकमार देशमुख यांनी व्यक्त केली. तालुक्यातील बर्दापूर येथील माऊली सेमी अॅन्ड इंग्लिश स्कूल जागतिक पातळीवर विद्यार्थी सक्षम बनावेत, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी एमपीएससी, यूपीएससीसाठी तयार करत असते. शाळेमध्ये ज्युनिअर आय.ए.एस, मॅथ, सायन्स, इंग्लिश ओलंपियाड, नवोदय, कॉलरशिप व विवीध प्रकारच्या स्पर्धात्मक परीक्षा घेतल्या जातात. सर्व विद्यार्थी ग्रामीण भागातले असल्यामुळे त्यांना ट्युशन्स घेता येत नाही म्हणून शाळा या स्पर्धात्मक परीक्षा ची तयारी करण्यासाठी शाळेमध्येच अधिकचे तास घेऊन शिकवले जाते. नुकताच स्कॉलरशिप परीक्षेचा निकाल जाहिर झाला आसुन माऊली स्कूलचे १० विद्यार्थी स्कॉलरशिप परीक्षेत झळकले आहेत. शाळेचे मुख्याध्यापक तानाजी मोरे, मुख्याध्यापिका सुकमार देशमुख यांनी विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

# शाश्वत जलस्रोतासाठी तिगावकरांचा पुढाकार

## लोक सहभागातून जमवला लाखोंचा निधी

**वडवणी (प्रतिनिधी):** तालुक्यातील तिगाव येथे शिवारातील पाणी पातळी वाढावी यासाठी लोकसहभागातून दोन लक्ष ३० हजार निधी गोळा करण्यात आला आहे. शेत शिवारात या माध्यमातून जलयुक्त करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे.

प्राज फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्याने व गाव लोकसहभागातून, विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीमार्फत नदी खोलीकरण, रुंदीकरण, माती बंधारे, सिमेंट बंधारे खोलीकरणाच्या कामाला सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं. सदस्य सर्व गावकऱ्यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली. पहिल्याच बैठकीत लोकसहभागातून दोन लक्ष ३० हजार निधी जाहीर झाला.

लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष अॅड. राज पाटील, प्रकल्प संचालक प्रकाश चोले, प्राज फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्याने व विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटी मार्फत प्रकल्प राबवण्यात येणार आहे. यामध्ये प्राज फाउंडेशन मदत ७० टक्के आणि स्थानिक लोकसहभाग ३० टक्के सहभाग राहणार असल्याचे सांगण्यात आले. नदी खोलीकरण, रुंदीकरण, सि जलसमितीच्या ोमेंट बंधारे, खोलीकरण करणे, डोह पद्धतीने पावसाचे पडणारे पाणी व वाहून जाणारे पाणी अडविणे व जमिनीमध्ये जिरवणे आदी होणाऱ्या कामामुळे जमीनीत पाण्याचे भूजल पुनर्भरण होऊन जमिनीची पाणी पातळी वाढणार आहे. त्यामुळे गाव शिवारातील, पंचक्रोशीतील शेतकऱ्यांच्या शेतातील मुख्य जलस्त्रोत असलेल्या विहीर, बोअरवेलला पाणी वाढणार आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे. तिगावची कोरड्या दुष्काळा पासून नक्कीच सुटका होऊ शकते. दरवर्षी उन्हाळ्यामध्ये पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात टँकरचा वापर केला जातो. तो या कामामुळे नक्कीच दुष्काळ निवारणासाठी फायदा होऊन टँकन मुक्त होऊ शकते. या कार्यक्रमास मान्यवरांसह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पहिल्या टप्प्यातील प्रस्तावित कामे

मुख्य नदीचे खोलीकरण एकूण ४८० मी लांबी (१२० मी लांबीचे ४ डोह) खोलीकरण, दोन माती बंधारे खोलीकरण, मजबुतीकरण करणे. दोन सिमेंट बंधारे १२० मीटर लांबीचे खोलीकरण व रुंदीकरण करणे. ही कामे पूर्ण झाल्यास तिन कोटी लिटर पाणी साठा निर्माण होणार आहे. तर ९ कोटी लिटर पाण्याचे भूजल पुनर्भरण होणार आहे असे अॅड. राज पाटील यावेळी म्हणाले.

# बीड इंडियन डेन्टल असोसिएशनचा सांस्कृतिक महोत्सव उत्साहात संपन्न




**बीड (प्रतिनिधी):-** इंडियन डेन्टल असोसिएशन, शाखा बीड, तर्फे स्पंदन-२०२५ या सांस्कृतिक महोत्सवाचे बीड येथे आयोजन दि. २० एप्रिल २०२५ रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ.नरेंद्र काळे (अध्यक्ष, एम.एस.डी.सी.) व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनंत मुळे (अध्यक्ष, आय.एम.ए. बीड) व डॉ. हिमांशू श्रीवास्तव (डीन, ए.डी.सी.एच. बीड), तसेच आय.डी.ए. संघटनेचे बीड शाखेचे अध्यक्ष डॉ.उमाशंकर विश्वेकर, सचिव डॉ. विजयालक्ष्मी बायस, खजिनदार डॉ. मंगेश अंधारे आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाची सुरूवात धन्वंतरी पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व परीक्षण डॉ. उज्वला वनवे यांनी केले. गणेश वंदन- डॉ. सुधीर साळवे, डॉ.गणेश कांबळे, डॉ.गणेश फुंदे व वैभव उदार यांनी केले तसेच सितार वादन डॉ. तुषार श्रृंगारपुरे यांनी केले. त्यानंतर गायन आणि नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या.

गायन स्पर्धेमध्ये डॉ.राजु खामकर, डॉ.मंगेश अंधारे, डॉ.उमाशंकर विश्वेकर, डॉ.सुधीर साळवे, डॉ.गणेश कांबळे, डॉ.रेणुकादास जिंतुरकर व सौ.स्नेहलता जिंतुरकर, डॉ.गणेश फुंदे, डॉ.विशाखा फुंदे, डॉ.किरण सोनसळे, डॉ.जयसिंग रसाळ, डॉ.सुजाता जयेश विश्वेकर व वैभव उदार यांचा सहभाग होता. नृत्य स्पर्धेमध्ये डॉ. ऋतुजा ढाकणे, डॉ. शारदा कुलकर्णी, डॉ. रेशमा साळवे, डॉ. शितल सोनसळे, डॉ. विजयालक्ष्मी बायस, डॉ. किर्ती ठाकुर, डॉ. प्राची सांगवीकर, श्रीया खामकर, दुर्वा खामकर, वृंदा सानप, प्रज्वली लिंबगावकर आणि क्रिशा काकडे यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सांगता डॉ. आर.बी. जिंतुरकर आणि डॉ. टी. एच. श्रृंगारपुरे यांच्या काव्यवाचनाने झाली. नृत्य स्पर्धेमध्ये सोलो परफॉर्मन्ससाठी डॉ. ऋतुजा ढाकणे यांना प्रथम पारितोषिक तर डॉ. किर्ती ठाकुर यांना द्वितीय पारितोषिक मिळाले. त्यानंतर समुह नृत्य स्पर्धेमध्ये डॉ. शारदा कुलकर्णी आणि डॉ. रेशमा साळवे यांना प्रथम पारितोषिक तर डॉ. विजयालक्ष्मी बायस आणि डॉ. शितल सोनसळे यांना द्वितीय पारितोषिक मिळाले तसेच बालगटातील नृत्य स्पर्धेमध्ये वृंदा सानप, श्रीया खामकर, दुर्वा खामकर, प्रज्वली लिंबगावकर व क्रिशा काकडे यांना पारितोषिक मिळाले. गायन स्पर्धेमध्ये डॉ. राजु खामकर व श्री. वैभव उदार यांना प्रथम पारितोषिक तसेच डॉ. जयसिंग रसाळ व डॉ. सुजाता जयेश विश्वेकर यांना द्वितीय पारितोषिक मिळाले. समाजातील सर्वांच्या दातांचे आरोग्य सांभाळण्याच्या कामात व्यस्त असताना देखील स्पंदन-२०२५ या सांस्कृतिक महोत्सवाचा दर्जा सर्व दंत तज्ज्ञांनी अगदी उच्च कोटीला पोहोचवला. सर्व श्रोते डॉक्टर्स आणि त्यांचे कुटूंबिय अगदी मंत्रमुग्ध होऊन या महोत्सवाचा आनंद घेत होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आय.डी.ए. बीड संघटनेचे अध्यक्ष डॉ. उमाशंकर विश्वेकर, सचिव डॉ. विजयालक्ष्मी बायस, खजिनदार डॉ. मंगेश अंधारे, डॉ. राजु खामकर, डॉ. जयसिंग रसाळ, वैभव उदार, व सर्व दंत तज्ज्ञांनी विशेष मेहनत घेतली.

# 'नामसंकीर्तन भगवंत प्राप्तीचे सर्वात सोपे साधन'

## श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे श्री गुरु चैतन्य बाळनाथ महाराज यांचा पुण्यतिथी उत्सव

**बीड (प्रतिनिधी):** नामसंकीर्तन ही देव प्राप्तीची सर्वात सोपी साधना आहे, संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांनीही नाम साधनेचे महत्त्व सोप्या भाषेत समाजाला सांगितले. ते नेहमी लेने को हरिनाम... देने को अन्नदान. हा कबीरांचा दोहा समाजाला सांगायचे असे प्रतिपादन कीर्तनकार सुरेश जाधव यांनी केले. श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे श्री गुरु चैतन्य बाळनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्प गुंफताना ते बोलत होते.

'नाम संकीर्तन साधन पै सोपे ! जळतील पापे जन्मांतरीची' या संत तुकाराम महाराज यांच्या सहा चरणाच्या अभंगावर जाधव महाराजांनी चिंतन मांडले. यावेळी सुरेश महाराजांनी सांगितले की संत आणि साधू पवित्र अशा भूमीमध्येच जन्म घेतात. संत बाळनाथ महाराज आणि दादा माऊली यांनी चाकरवाडी या ठिकाणी समाधी घेतली यामुळे चाकरवाडी हे पुण्यक्षेत्र आहे. संत महात्म्यांनी परमार्थामध्ये देवप्राप्तीचे मार्गदर्शन प्रत्येकाला केलेले आहे. संसारी जिवाचा ही उद्धार व्हावा ही संतांची मनोमन इच्छा आहे. देवप्राप्तीचे अनेक साधने आहेत अष्टांगयोग, कर्म ज्ञान, जप तप, अनुष्ठान, पण ही साधना सामान्य जीवाला करण्यासाठी अवघड आहेत. तसेच या सर्व साधनांसाठी अधिकारी असावा लागतो. येथे कुळ जाती वर्ण याचा भेदही पाहायला मिळतो. नाम संकीर्तन या साधनेमध्ये कुळ जाती वर्ण याचा भेद कधीही पाहायला मिळत नाही. कलियुगामध्ये उद्धार करण्यासाठी नामसाधनात सर्वश्रेष्ठ आहे असेही महाराज म्हणाले. नामस्मरण केले तर देवाच्या दारात जाण्याची गरज लागत नाही तर देवच तुमच्या दारात येतो. तुकाराम महाराज यांनी राम कृष्ण हरी विठ्ठल केशवा मंत्र हा जपावा सर्वकाळ असं सांगितलं आहे. नित्यनेमाने केलेली भक्ती देवाला आवडते. त्यामुळे शहाणी माणसं नाम संकीर्तन साधनेचाच अवलंब करतील. असंही महाराजांनी सांगितलं. वारकरी संप्रदाय हा मानवता धर्माचा पुरस्कर्ता आहे. जातीभेद वर्णभेद धर्मभेद चालत नाही, त्यामुळे वारकरी संप्रदायात भगव्या पताके खाली जातीवादाला मूठ माती देऊन विषमतेची भिंत उध्वस्त करण्याचं काम वारकरी संतांनी केलेला आहे असेही ते म्हणाले. यावेळी त्यांना कीर्तनात गायनाचार्य अभिमान ढाकणे, प्रशांत क्षीरसागर, रोडे, अविष्कार क्षीरसागर, रमेश पिंपळे यांनी साथ संगत केली. यावेळी महादेव चाकरवाडीकर, नवनाथ महाराज, अभिमान महाराज ढाकणे, प्रशांत महाराज क्षीरसागर, नानासाहेब काकडे, यांच्यासह शेकडो भावीक भक्तांची उपस्थिती होती.

# 'विद्यार्थ्यांना रसायनशास्त्र विषयात नोकरीच्या अनेक संधी'

## बलभीममध्ये द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात प्राचार्यांचे प्रतिपादन

**बीड (प्रतिनिधी):** रसायनशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना पदवी प्राप्त केल्यानंतर नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. महाविद्यालयातून मिळालेल्या ज्ञानाच्या शिदोरीवर आपण रसायनशाखामध्ये ज्या काही करिअर संधी असतील त्या मिळवाव्यात. एम.एस्सी. पास झाल्यानंतर विद्यार्थ्यांना नौकरीसाठी महाविद्यालय ट्रेनिंग आणि प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून नोकरीसाठी आजपर्यंत सहकार्य करत आलेले आहे व येथून पुढेही विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यात येईल. असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष उंदरे यांनी केले.

येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाच्या वतीने पदव्युत्तर द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभात अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. याप्रसंगी डॉ. महादेव साखरे, प्रा. एस.ए. सुरवसे, डॉ.ए. बी. दन्ने यांची उपस्थिती होती. प्रा.एस. ए. सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना रसायनशास्त्र विभागाची गौरवशाली व यशस्वी परंपरा विद्यार्थ्यांना सांगितली तसेच रसायनशास्त्र विभागातील अनेक गुणवंत विद्यार्थ्यांनी एम.एस्सी केल्यानंतर त्यांनी अनेक क्षेत्रात उत्तुंग अशी झेप घेत रसायनशास्त्र विभागाचा यशाचा आलेख वाढवला आहे, आपणही अशाप्रकारे आपल्या ज्ञानाच्या जोरावर करिअरच्या संधी मिळवाव्यात असा मौलिक सल्ला दिला. डॉ. महादेव साखरे यांनी विद्यार्थ्यांना रसायनशास्त्रातील करिअरच्या संधी बद्दल मार्गदर्शन करून जीवनाकडे सकारात्मक पहावे असा सल्ला दिला. यावेळी आदिती काटकर व मोहन काळे या दोन गुणवान विद्यार्थ्यांचा प्राचार्यांच्या हस्ते रसायनशास्त्र विभागातर्फे विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात बोलताना म्हटले, रसायनशास्त्र विभागातील गुरूजन उच्च विद्याविभूषित असून त्यांच्या मार्गदर्शनामुळे आम्हाला रसायनशास्त्र विषय सोपा वाटला. जिल्ह्यातील या नामांकित महाविद्यालयात शिकताना नवनवीन गोष्टी शिकायला मिळाल्या व जीवनात यशस्वी होण्याची सकारात्मकता आमच्यात आली. सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ.पी. डी. जावळे यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रा. एस. ए. सुरवसे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.जी. डी खान, प्रा, लोकरे, प्रा. खरात यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमासाठी रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वेल्डन कलेक्टर..! विवेकजी

## सुटीच्या दिवशी रणरणत्या उन्हात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा दौरा

## शेतकऱ्यांनो तुमच्या हिताचा फार्मर आयडी काढा



बीड (सरकार): रविवार २७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीकृष्ण शिंदे यांच्यासह रखरखत्या उन्हात दौऱ्यावर निघाले . उद्देश एकच – शासनामार्फत शेतकऱ्यांच्या हितासाठी फार्मर आयडी काढून देण्याची प्रक्रिया सुरू आहे , तथापि त्यास पाहिजे तसा प्रतिसाद जिल्ह्यातून नाही म्हणून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढावा यासाठी ही धावपळ . सर्वात आधी जिल्हाधिकाऱ्यांचा ताफा पोहोचला शहरातील आयटीआय कॉलेज परिसरात . तेथे प्रस्तावित इंक्युबेशन सेंटर म्हणजेच नवीन उद्योजकांसाठी प्रशिक्षण केंद्राची जागा पाहण्यासाठी . त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी जेथे शेतकऱ्यांचे फार्मर आयडी काढून देण्याचे काम सुरू आहे , अशा एक–दोन ठिकाणी घेऊन चला अशा सूचना केल्या . त्यानुसार तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी वासनवाडी ग्रामपंचायत येथे ताफा वळविला . याठिकाणी वासनवाडी येथील सरपंच गणेश खोड , अशोक भाऊले , नंदकुमार खोड व गावातील नागरिक , मंडळ अधिकारी बाबासाहेब तांदळे , ग्राम महसूल अधिकारी शशांक कुलकर्णी , जगन्नाथ राऊत , शरद घोडके उपस्थित होते .

जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थितांना फार्मर आयडी का काढावा याचे महत्त्व विशद करताना सांगितले की देशातील प्रत्येक नागरिकाचा वेगळा आधार आयडी आहे . त्याच पद्धतीने महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याचा एक युनिक फार्मर आयडी तयार केलं जाणार आहे . केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या यूनिक फार्मर आयडी आणि त्यांच्या जमीन रेकॉर्डला जोडण्याची ( लिंक करण्याची ) मोहीम सुरू आहे . सध्या त्यासंदर्भात प्रशासकीय पातळीवर राज्यात गाव पातळीवर विशेष कॅम्प आयोजित करून एक कोटी पेक्षा जास्त शेतकऱ्यांचे युनिक फार्मर आयडी तयार केले जाणार आहेत . विशेष बाब म्हणजे भविष्यात शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ याच युनिक फार्मर आयडी च्या माध्यमातून मिळणार आहे . तसेच जमिनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार करण्यासाठी ही भविष्यात हे युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरणार आहे . त्यामुळे महसूल , कृषी आणि ग्रामविकास विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने शेतकऱ्यांनी युनिक फार्मर आयडी तयार करून घेणे महत्वाचे ठरणार आहे . ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत तयार होणारे युनिक फार्मर आयडी भविष्यात शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे . पीएम किसान सन्मान योजनेचे अनुदान मिळविणे , किसान क्रेडिट कार्ड बनविणे , पीक विमा काढणे , त्या अंतर्गत परतावा मिळविणे यासाठी युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरेल . शिवाय सरकारने जाहीर केलेली पिकांची नुकसान भरपाई मिळविणे , पीक व शेती विषयक सर्वेक्षण करून घेणे , शेतमालाची एमएसपीच्या दराने विक्री करणे , कृषी विभागाच्या विविध योजना अंतर्गत कृषी निविष्ठा व इतर सेवांचा लाभ मिळविणे , बाजारपेठेची माहिती , कृषी विषयक कामासंदर्भात कृषी तज्ञांचे मार्गदर्शन मिळविणे यासाठी युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरणार आहे . शेत जमिनीच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारासाठी हे युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरेल .एवढंच नाही तर सरकारलाही या युनिक फार्मर आयडीच्या माध्यमातून कोणत्या शेतकऱ्याची कुठे किती जमीन आहे . कोणता शेतकरी कोणकोणत्या योजनांचा लाभ घेत आहे हे सर्व एका क्लिकवर माहीत होणार आहे . या युनिक फार्मर आयडीच्या माध्यमातून सरकारला चालू हंगामात राज्यातील किती शेतकऱ्यांनी कोणते पीक घेतले आहे , याची माहिती एका क्लिक वर मिळेल . यासाठी सर्व शेतकरी बंधू आणि भगिनींनी युनिक फार्मर आयडी काढून घ्यावा , असेही जिल्हाधिकारी यांनी आवाहन केले . यावेळी वासनवाडी येथील शेतकरी मदन घाटे यांना तात्काळ समोरासमोर फार्मर आयडी काढून दिला .



त्यानंतर प्रस्तावित विमानतळाची जागा बघण्याचा मानस जिल्हाधिकारी यांनी व्यक्त केला . त्यानुसार कामखेडा येथील सुमारे साडेतीन किलोमीटर लांबीची व ३५० मीटर रुंदीच्या प्रस्तावित धावपट्टीची व परिसराची पाहणी जिल्हाधिकाऱ्यांनी केली . यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीकृष्ण शिंदे , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी माहिती दिली . तहसीलदार चंद्रकांत शेळके , मंडळ अधिकारी अंगद काशीद यांनी नकाशा आधारे प्रस्तावित विमानतळाच्या हद्दी खुणा , कोणते गट समाविष्ट होतील यासंदर्भात सविस्तर माहिती सांगितली . यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी कामखेडा येथील सी एस सी केंद्राला भेट दिली . यावेळी सरपंच बिलाल पटेल , सचिन जमदाडे , गजानन फाटे , सय्यद मोहम्मद सय्यद उस्मान , गणेश नेवडे , अरुण पवार , परमेश्वर पवार , रज्जाक शेख , प्रकाश वाघमारे , अब्दुल रहीम उस्मान शेख , सलीम शेख , मंडळ अधिकारी अंगद काशिद , अनिल तांदळे , ग्राम महसूल अधिकारी शरद घोडके , कृष्ण रत्नपारखे , गणेश गायकवाड , विकास ससाणे , आप्पासाहेब पवार उपस्थित होते . यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रीस्टॅक प्रकल्पातर्गत फार्मर आयडी काढण्याचे काय महत्त्व आहे , याबद्दल सविस्तर माहिती दिली . तसेच सय्यद मोहम्मद सय्यद उस्मान या शेतकऱ्याचा फार्मर आयडी समोर काढून घेतला . गावकऱ्यांनीही जिल्हाधिकाऱ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला .



रखरखत्या उन्हात , सुट्टीच्या दिवशी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पाहणी दौरा केला . शेतकऱ्यांशी चर्चा केली , त्यांच्या समस्या जाणून घेतल्या . फार्मर आयडी काढण्यासाठी तळमळ व्यक्त केली . त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केल्या जात आहे .

जिल्ह्यात सर्वत्र उपविभागीय अधिकारी , तहसीलदार , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांच्यामार्फत तसेच गटविकास अधिकारी , ग्रामसेवक , तालुका कृषी अधिकारी , कृषी सहाय्यक यांच्यामार्फत फार्मर आयडी काढून देण्याचे काम वेगाने सुरू आहे . नागरिकांनी सुद्धा स्थानिक तलाठी , ग्रामसेवक , कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधून पुढील दोन दिवसात शंभर टक्के फार्मर आयडी ग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत काढून घ्यावेत , असे आवाहन यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले .

# डीबीटी म्हणजेच डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर नोंदणी सर्वांना करणे आवश्यक–तहसीलदार शेळके



बीड (सरकार): बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शुक्रवारी तहसील कार्यालयातील संजय गांधी विभागास भेट देऊन आलेल्या खातेदारांची आस्थेवाईकपणे चौकशी केली व त्यांची कामे तात्काळ मार्गी लावण्याबाबत सूचना केल्या .

बीड तालुक्यात संजय गांधी योजनेचे म्हणजेच ज्यांचा वयोगट १८ ते ६५ वर्षे आहे , त्यांची लाभार्थी संख्या ८८६० इतकी आहे . या लाभार्थ्यांना राज्य शासनामार्फत प्रतिमाह १५०० रुपये इतके मानधन देण्यात येते . श्रावण बाळ योजनेचे लाभार्थी हे ६५ वयापुढील असतात . अशा लाभार्थ्यांची तहसील बीड अंतर्गत संख्या ८८२४ इतकी आहे . ६५ वर्षावरील लोकांना इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन अनुदान योजना सुद्धा असून त्या योजनेचे ३७३१ लाभार्थी आहेत . या योजनेत राज्य शासन १००० रुपये तर केंद्र शासन ५०० रुपये इतके मानधन लाभार्थ्यांना देत असते .

संजय गांधी विभागाची सध्या डीबीटी पोर्टलवर लाभार्थी नोंदणी करण्याची मोहीम वेगाने सुरू आहे . यासाठी अव्वल कारकून हेमलता परचाके , महसूल सहायक वैशाली बहिरवाळ , गंगाधर जवरे यांच्यासह ऑपरेटर महेंद्र राऊत मोठ्या प्रमाणात मेहनत घेत आहेत .

तहसीलदार शेळके यांनी लाभार्थ्यांशी बोलताना सांगितले की डीबीटी म्हणजेच डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर नोंदणी सर्वांना करणे आवश्यक आहे . त्यासाठी लाभार्थ्यांचे आधारकार्ड हे मोबाईल क्रमांकास लिंक असणे अनिवार्य आहे . कुठल्याही आधार केंद्रावर अथवा महा–ई–सेवा केंद्रावर जाऊन तुम्हाला ते तपासता येईल . आधी मोबाईल क्रमांक आधार कार्डशी जोडून घ्यावा , त्यानंतर आपलं बँक खातं हे आधार कार्डशी लिंक आहे की नाही हे पहावं . त्यासाठी महा–ई–सेवा केंद्र किंवा आपले सरकार केंद्रावरून आपले आधार कार्ड बँक खात्याशी जोडले आहे का हे तपासावे . तसे ते जोडलेले नसल्यास बँकेत जाऊन ते लिंक करून घ्यावे .

डीबीटीचा अर्ज भरून घेताना त्यावर मोबाईल क्रमांक सुद्धा टाकावा लागतो . आणि लगेच त्या मोबाईल क्रमांकावर एक ओटीपी म्हणजेच वन टाइम पासवर्ड जातो . तो ओटीपी सांगावा लागतो . तो ओटीपी ऑपरेटरला सांगितल्यास लगेच डीबीटीची प्रक्रिया संपते . एकदा ओटीपी दिला आणि तो ऑपरेटर मार्फत संगणकावर नोंदविण्यात आला म्हणजे डीबीटीची प्रक्रिया संपलेली असते .

दिव्यांग अभिमान घुमरे , आसाराम चव्हाण सारख्यांना नायब तहसीलदार प्रशांत जाधवर ठरू लागले आधार : स्वतः करुन दिली नोंदणी* ज्याला कुणाचाही आधार नाही , वयोवृद्ध आहेत , अशा निराधार व्यक्तींना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी सरकारकडून विविध योजनांच्या माध्यमातून महिन्याकाठी ठरावीक मानधन अदा केले जाते . हे मानधन लाभार्थ्यांना तहसील स्तरावरून बँकेत पाठवून संबंधितांच्या खात्यात वर्ग करण्याची प्रक्रिया केली जाते . आता मात्र थेट 'डीबीटी'मार्फत निराधार अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग होत आहे . त्यासाठी आधारकार्ड अपडेट करून मोबाइल क्रमांक बँक खात्याला लिंक केलेला असावा . कागदपत्रांची पूर्तता लवकर पूर्ण करावी , असे आवाहन प्रशासनाने केले आहे . प्रशांत जाधवर , नायब तहसीलदार यांनी दिनांक २४ एप्रिल रोजी घाटजवळा येतील घुमरे अभिमान ओंकारराव हे दिव्यांग असल्याने व त्यांना हालचाल करता येत नसल्याने आपण त्यांना तहसील कार्यालय येथे अथवा डीबीटी कॅम साठी ताडसोन्ना येथे न बोलवता त्यांची आवश्यक ती कागदपत्रे व्हाट्सअपला मागवून त्याची सत्यता तपासून त्यांची डीबीटी घरबसल्या करून दिली . तसेच शनिवारी नाथापूर येथे दिव्यांग आसाराम चव्हाण यांची गावात जाऊन नोंदणी करुन दिली . संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजना इत्यादी योजनेचे असे कोणी दिव्यांग , अतिवृद्ध लाभार्थी असतील , ज्यांना हालचाल करणे अशक्य आहे व जे तहसील कार्यालय किंवा डीबीटी कॅम्प साठी येऊ शकत नाहीत , त्यांचे आधार कार्ड , राशन कार्ड , बँक पासबुक ८१४९४६८८८४ या नंबर वर व्हाट्सअपला कळवा , अथवा सजाचे ग्राम महसूल अधिकारी तथा मंडळ अधिकारी यांचे मार्फत कळवावे अथवा थेट माझ्याशी संपर्क साधावा असे त्यांनी म्हटले आहे . प्रत्येकाने आपले मित्र , नातलग , परिचित , शेजारी व तालुक्यातील सर्व नागरिकांना हा मेसेज कळवा असे आवाहन तहसील प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेतून नव्याने घरकूल मिळविण्यासाठी सेल्फ सर्व्हे करून घ्या

## आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन



बीड (सरकार): पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून. त्याकरिता सध्या ऑनलाईन सेल्फ सर्व्हे करणे चालू आहे. बीड मतदारसंघातील ज्या नागरिकांना घर नाही अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत ३० एप्रिल पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी जिल्ह्याभरात सध्या सद्या सर्व्हे सुरु आहेत. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकतात. निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेत आपली नोंदणी करावी, नोंदणी करण्यासाठी ३० एप्रिल ही शेवटची तारीख असून त्या अगोदर बीड मतदारसंघातील पात्र नागरिकांनी आपली नोंदणी करुन घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

सेल्फ सर्व्हे करण्यासाठी आवास प्लस– २०२४ हे शासनाचे अधिकृत प्ले–स्टोअरवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टॉल करावे, नंतर आधार फेस आरडी हे प देखील इंस्टॉल करुन घ्यावे, त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून पवर विचारलेली माहिती भरावी, शेवटी आपल्या कच्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा, आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा. घरकुल सेल्फ सर्व्हेच्या प्रक्रियेत कोणत्याही टप्प्यावर अडचण असल्यास आपल्या ग्रामसेवक / ग्रामपंचायत अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच काही तांत्रिक अडचण असल्यास १८००–११०–१११ या टोल–फ्री क्रमांकावर संपर्क करावा. यासोबतच प्रशासनासंबंधित काही तक्रार असल्यास ९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही आ.क्षीरसागर यांनी केले आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत गरजू सर्व्हे पूर्ण करून घेण्याचे धनंजय मुंडे यांचे आवाहन



परळी (सरकार): प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गरजू नागरिकांना घरकुलांचा लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या मार्फत किंवा स्वतःच्या माध्यमातून सर्वे करण्याचे काम सुरू असून याची मुदत येते ३० एप्रिल रोजी संपणार असल्याने गरजू व पात्र असलेल्या लाभार्थ्यांनी घरकुलासाठी स्वतः पवरून किंवा ग्रामसेवकाच्या मार्फत आपला सर्वे पूर्ण करून घ्यावा असे आवाहन माजी मंत्री तसा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी केले आहे.

परळी तालुक्यात आतापर्यंत ३१६४ लाभार्थींचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून त्यापैकी २६३४ सर्व्हे हे नागरिकांनी स्वतः पूर्ण केले असून ४९९ सर्वे हे ग्रामसेवकांच्या मार्फत पूर्ण करण्यात आले असल्याची माहिती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय केंद्रे यांनी दिली आहे. दरम्यान येत्या ३० एप्रिल रोजी सर्वे पूर्ण करण्याची मुदत संपणार असून त्याआधी पात्र असलेल्या गरजू नागरिकांनी आपल्या घरकुलांचे सर्वेक्षण पूर्ण करून घ्यावे. कागद पत्रांची किंवा त्रुटींची पूर्तता करण्यासाठी परळी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मदत करणार असून कुणाला मदतीची आवश्यकता असल्यास त्यांनी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके यांना संपर्क करावा असे आवाहनही धनंजय मुंडे यांच्या वतीने करण्यात आले आहे. याआधीही धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी नगर परिषदेने रमाई आवास सह विविध योजनेतून विक्रमी घरकुले मंजूर करून दिलेली आहेत.

# मयूर मित्र मंडळ व नायगांव ग्रामस्थांनी केला डॉ. पंकज औटे यांचा भव्य नागरी सत्कार

बीड (सरकार): जिल्ह्यातील युपीएससी व एमपीएससी मध्ये पात्र ठरलेल्या गुणवंत भूमिपुत्रांच्या सत्काराचे भव्य आयोजन मयूर मित्र मंडळ, मयूर सार्वजनिक वाचनालय, ग्रामपंचायत कार्यालय नायगाव, व लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस विचार मंचाच्या व डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटाच्या वतीने करण्यात आले होते. यात नायगाव चे भूमिपुत्र डॉ. पंकज औटे , डॉ. सुशील गीत्ते, यांचा ीिलि परीक्षेत तर बिबीशन बेद्रे, राजेश निर्मळ, कुमारी कोमल भोंडवे यांचा ीिलि परीक्षेत पात्र ठरल्याने ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.



मयूर मित्र मंडळाच्या माध्यमातून नायगाव या गावात गेली २० वर्षापासून गावातील गुणवंत विद्यार्थी, शासकीय सेवेत यशस्वी ठरलेले, नवीन शासकीय नोकरीस लागलेल्या युवकांचा सत्कार सोहळा आयोजित करण्याची परंपरा कायम ठेवत, नायगाव चे भूमिपुत्र डॉक्टर पंकज औटे यांचा देखील भव्य सत्कार सोहळा आयोजित करून त्यांच्या सर्व कुटुंबियांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमास बीड जिल्हा परिषदेचे सदस्य अँड .प्रकाश दादा कवठेकर, नायगांव चे सरपंच श्री. संदीप कवठेकर, मयूर मित्र मंडळाचे अध्यक्ष श्री. सय्यद शाहिद सर, उपसरपंच बाबाभाई पठाण, मा. सरपंच श्री. कवठेकर संजय, अध्यक्ष श्री. विष्णू मोहळकर, उद्योजक दाऊद पठाण, मजीद शेख, माजी सरपंच महादेव जयभाये, माजी सरपंच रवींद्र रांजवन,जितेंद्र खेडकर, मच्छिंद्र औटे, प्रताप भोसले, डॉ.शगिर पठाण , राजू पठाण,चंद्रसेन औटे, राहुल वनवे, भगवान मोहळकर,जुबेर पठाण, अनिल खाडे, अस्लम पठाण, अतिक पठाण, हुमायून पठाण , गजानन भोसले, सुशील औटे सर, ज्ञानदेव काशीद, विकास वनवे याच्या सह गावातील व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने हजर होते.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड–४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड–४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही– वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)